.. Shri Krishna Arati ..

# ॥ श्रीकृष्ण आरती ॥

हरि चला मंदिरा ऐशा म्हणती गोपिका म्हणती राधिका ।
भावें ओवाळिती यदुकुलतिलका ॥ धृ ॥

एकीकडे राई एकीकडे रखुमाई ।
भावे ओवाळिता हरिसी तूं होसी दो ठाई ॥ हरि॥ १॥

अष्टाधिक सोळा सहस्र ज्याच्या सुंदरा ज्याच्या सुंदरा ।
जिणे जिणें प्रार्थिलें जासी तियेच्या घरा ॥ हरि ॥ २॥

एका जनार्दनी हरी तूं लाघवी होसी ।
इतक्याही भोगुनी ब्रह्मचारी म्हणवीसी ॥ हरि ॥ ३॥

इति

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated January 23, 1999